**वाचले :-**

१) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
२) बाजार व जत्रा अधिनियम १८६२ चे नियम ५ग
३) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३
४) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
५) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना क्रमांक - No:DMU/२०२०/CR.९२/DisM-१/दि.१३/०४/२०२०.
७) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाईआदेश/एस.आर.क्र.११/२०२० दि.१४/०३/२०२०.
८) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाईआदेश/एस.आर.क्र.१२/२०२० दि.१६/०३/२०२०.
९) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/बाजारबंद आदेश/ एस.आर. क्र.८६२/२०२० दि.१६/०३/२०२०.
१०) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाईआदेश/एस.आर.क्र.१५/२०२० दि.२२/०३/२०२०.
११) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाईआदेश/एस.आर.क्र.१६/२०२० दि.२४/०३/२०२०.
१२) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाईआदेश/एस.आर.क्र.१९/२०२० दि.३१/०३/२०२०.

---

क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/एस.आर.२२/२०
जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर
दिनांक:-१४/०४/२०२०

**आदेश :**

ज्याअर्थी, राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधीत करणे आवश्यक आहे. त्या करीता पालघर जिल्हयातील कार्यक्षेत्रामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश पारित करण्यात आलेला आहे.

ज्या अर्थी, करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपोद्घातातील अ.क्र.६ च्या अधिसुचनेव्दारे राज्यामध्ये लॉकडाऊन परिस्थिती दि.३०/०४/२०२० पर्यंत लागू करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.७,८,९,१० व ११ अन्वये पालघर जिल्हयामध्ये घेण्यात येणाऱ्या सभा, मेळावे, सामाजिक कार्यक्रम, जत्रा, यात्रा, दिंडया, पदयात्रा, ऊरुस, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडास्पर्धा, जिल्हयातील पर्यटन व धार्मिक स्थळे, धरणे, तरणतलाव, किल्ले इत्यादि या ठिकाणी जाण्यास तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३ तसेच बाजार व जत्रा अधिनियम १८६२ चे नियम ५ ग अन्वये आठवडा बाजार भरविण्यास मनाई आदेश पारीत करण्यात आले होते. त्यानंतर उपोद्घातातील आदेश क्र.१२ अन्वये या कार्यालयाकडून लागू करण्यात आलेले उपरोक्त सर्व मनाई आदेशांची मुदत दि.१४/०४/२०२० पर्यंत वाढविण्यात आली होती. तद्नंतर महाराष्ट्र शासनाने उपोद्घातातील अ.क्र. ६ अन्वये दि.३०/०४/२०२० पर्यंत राज्यामध्ये लॉकडाऊन परिस्थिती लागू केलेली आहे. तसेच मा.पंतप्रधान, भारत

सरकार यांनी दि.०३/०५/२०२० पर्यंत लॉकडाऊन लागू राहील असे जाहिर केले आहे. त्याअनुषंगाने पालघर जिल्हयात कायदा व सुव्यवस्था राखणेकामी व जिल्हयामध्ये करोना विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून सदरचे मनाई आदेश दि.०३/०५/२०२० पर्यंत लागू ठेवणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **डॉ. कैलास बा. शिंदे, जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३ तसेच बाजार व जत्रा अधिनियम १८६२ चे नियम ५ ग अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये पालघर जिल्हयामध्ये घेण्यात येणाऱ्या सभा, मेळावे, सामाजिक कार्यक्रम, जत्रा, यात्रा, दिंडया, पदयात्रा, ऊरुस, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडास्पर्धा, जिल्हयातील पर्यटन व धार्मिक स्थळे (अपवादात्मक प्रकरणां व्यतिरिक्त धार्मिक सभा बंद राहतील), धरणे, तरणतलाव, किल्ले इत्यादि या ठिकाणी जाण्यास तसेच आठवडा बाजार भरविण्यास या आदेशान्वये **दिनांक १४/०४/२०२० रोजी रात्री १२.०१ ते दिनांक ०३/०५/२०२० रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत मनाई आदेश लागू करीत आहे.**

तथापी, जिल्हयातील अत्यावश्यक व जीवनावश्यक सेवा पुरविणाऱ्या खालील आस्थापनांना यातून वगळण्यात आले आहे. सदर आदेश खालील बाबतीत लागू होणार नाही.

१. दुध, अन्न पुरवठा सेवा, अन्नधान्य, किराणा, चिकन, मटण, अंडी, मासे.
२. फळे व भाजीपाला.
३. पशु व पोल्ट्री खाद्य व त्याची वाहतूक.
४. हॉस्पीटल, मेडीसीन व फार्मास्युटीकल्स संबंधित सेवा, वैद्यकीय साहित्य (Medical Equipment)
५. बँकींग व वित्तीय सेवा, विमान सेवा संबंधित सेवा.
६. दुरध्वनी व संचार सेवा.
७. बंदर संबंधित सेवा.
८. प्रसार माध्यमे संबंधित.
९. विज, पेट्रोलियम, ऑईल आणि एनर्जी संबंधित.
१०. पिण्याचे पाणी व पाणी पुरवठा
११. मत्स्य खाद्य व कोलंबी खाद्य व त्याची वाहतूक (आवश्यक फलक लावून)
१२. कृषी निविष्ठा विक्री केंद्रे व त्याची वाहतूक (आवश्यक फलक लावून)
१३. वरील सर्व बाबींशी संबंधित वेअर हाऊसिंग, वरील सर्व बाबींशी संबंधित पुरवठा साखळी (Supply Chain)
१४. वरील सर्व सेवांशी संबंधित IT Services (मर्यादित मनुष्यबळावर)
१५. अत्यावश्यक वस्तू/माल व त्या संबंधित मनुष्यबळाची वाहतूक करणारी वाहने (आवश्यक फलक लावून)
१६. पोलीस व आरोग्य विभाग तसेच आपत्ती निवारण व्यवस्थापनाशी संबंधित वाहने (फक्त कर्तव्यार्थ)
१७. तातडीने रुग्णवाहतूक व हॉस्पीटलमधील डॉक्टर व पॅरामेडीकल स्टाफ (फक्त कर्तव्यार्थ)
१८. माझ्यावतीने व पोलीस अधीक्षक पालघर यांनी परवानगी /पासेस दिलेल्या व्यक्ती व वाहने.

(टिप :- वर नमुद प्रमाणे सवलत दिलेल्या अधिकारी व कर्मचारी तसेच खाजगी व्यक्ती यांनी त्यासाठी त्यांचे ओळखपत्र व सदर विशेष कार्यासाठी नेमणूकीबाबतचे आदेश तसेच रुग्णांनी आवश्यक कागदपत्रे रुग्णांनी सोबत बाळगणे आवश्यक असेल.)

जिल्हा दंडाधिकारी जिल्हा